“प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचार : एक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

-:: संशोधक::-

चपडे गणेश नारायणराव

-:: मार्गदर्शक ::-

प्रा.डॉ.कदम व्यंकट काशिनाथराव

-:: अभ्यासकेंद्र ::-

शिक्षणशास्त्र संकूल

१.१ प्रस्तावना :-

शिक्षण ही एक सतत चालणारी प्रकिया आहे. व्यक्ती आपल्या जीवनात निरंतरपणे शेवटच्या श्वासापर्यंत शिकतच असतो. जीवनात येणाऱ्या प्रत्येक अनुभवातुन व्यक्ती काहीना काही शिकतच असतो. प्रत्येक क्षणाला नविन शिकण्याची क्रिया चालुच असते. प्रत्येक क्षण व्यक्तीला काही नवीन अनुभव देवुन जातोच ही एक अनुभवनाची शिदोरी मानली जाते. अखंड चालणाऱ्या अनुभवप्रक्रियेतुनच व्यक्तीचे जीवन घडत असते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे. फक्त साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षणाची सुरुवातही नव्हे, व्यक्तीचा बोधात्मक , भावात्मक व क्रियात्मक विकास घडवुन आणणे हे शिक्षणाचे महत्वपुर्ण कार्य आहे. व्यक्तीच्या शरीर, मन आणि कौशल्याचा विकास शिक्षणातुन झाला पाहिजे. शिक्षणामुळे व्यक्तीत निर्भयता आली पाहीजे म्हणजेच व्यक्तीची भयापासुन मुक्तता झाली पाहीजे. शिक्षणातून व्यक्तीला सतकर्म करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे.

शिक्षण म्हणजे वर्तनबदल पण त्या बदलाची दिशा ही सद्वर्तनाकडे असली पाहिजे. सद्वर्तनामुळे व्यक्तीला सद्‌गती मिळते म्हणुन शिक्षण व्यक्तीला सद्‌गती प्राप्त करुन देते.

व्यक्तीचा अध्यात्मिक विकास होणे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे. अध्यात्मिक विकासाशिवाय व्यक्तीला पूर्णत्व प्राप्त होत नाही त्यामुळे शिक्षणातून व्यक्तीच्या अध्यात्मिक विकासाला चालना मिळाली पाहिजे.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उपयुक्त असलेली मूल्ये ही त्या क्षेत्रातील महान विचारवंताच्या विचारमंथनातून बाहेर पडतात. ती तत्वे स्थल काल सापेक्ष परिस्थिती संदर्भाच्या पार्श्वभूमीवर मांडलेली असतात. त्यांची दखल घेणे काळाजी गरज ठरते. याला शिक्षणक्षेत्रही अपवाद नाही.

कारण शिक्षण क्षेत्रातील विचारवंताच्या विचारमंथनातूनही शिक्षणाच्या सद्य परिस्थितीच्या संदर्भातील पार्श्वभूमीवर काही शिक्षणविषयक मूल्ये तत्वे बाहेर पडतात. त्याची दखल घेणे हे शिक्षण क्षेत्रात काम करण्याच्या दृष्टिने गरजेचे ठरते त्यामुळे शिक्षणाला एक नवी दिशा, चैतन्य मिळते.

वरील बाबींचा विचार करता वर्तमान परिस्थितीत शिक्षणक्षेत्रात स्वत:ला वाहून घेतलेले, त्याविषयी कमालीची आस्था असणारे आणि शिक्षणक्षेत्रात स्वत:च्या कर्तृत्वाने एक वेगळाच ठसा उमटवणारे व शिक्षणाला नवी तत्वे, मूल्ये यांच्या आधारावर नवचैतन्य प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला. प्राचार्य शिवाजीराव भोसले हे अशा विचारवंतातील अग्रणी आहेत.

'आज अंधार फार झाला, पणती जपून ठेवा ' असेच एकंदरीत वातावरण आहे. गरज आहे ती मनामनातल्या माणुसकीच्या, विवेकाच्या, संयमाच्या अंर्तज्योती पेटवण्याची ते सामर्थ्य प्राचार्यांच्या विचारात आहे. आपल्या वक्तृत्वाने त्यांनी महाराष्ट्राला संस्कार संपन्न केले आहे. व्याख्यानांच्या माध्यमातून लोकशिक्षण व लोकजागरणाचे काम ते करीत पर्व महाराष्ट्राच्या वैचारिक जडण घडणीत त्यांचे योगदान असामान्य आहे. म्हणूनच त्यांचे जीवन व कार्य हा अभ्यासाचा विषय झाला आहे.

जीवननिष्ठा , आरोग्यदायी जीवन, ज्ञानसाधना, विचारांची स्वतंत्रताख विनम्रता, सातत्य, सत्यनिष्ठा, विशुध्द चरित्रय ही प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी आचरणात आणलेली व्रते आहेत. अशा समकालीन शिक्षयोग्याचे विचार समजून घेणे अगत्याचे आहे. या दृष्टिनेच पुढील समस्या अभ्यासार्थ घेतली आहे.

१.२ समस्या विधान :-

"प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचार : एक अभ्यास"

संशोधनाचा विषय अधिक स्पष्ट व्हावा यासाठी समस्येच्या विधानातील संज्ञाच्या संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे केलेल्या आहेत.

१.३ कार्यात्मक व्याख्या :-

१.३.१ प्राचार्य :-

"महाविद्यालयातील कारभार व व्यवस्थापन पाहणाऱ्या प्रमुख व्यक्तीस प्राचार्य म्हणतात. "

- **डायमंड, सामाजिक शब्दकोश, खंड-२**

१.३.२ शिवाजीराव भोसले :-

"शिवाजीराव भोसले हे तत्वज्ञानाचे प्रगाढ पंडित, अतिउत्कृष्ट वक्ते व महाराष्ट्रातील थोर विचारवंत, शिक्षणतज्ञ होते. "

१.३.३ शैक्षणिक विचार :-

"शिक्षणाची ध्येये व उदिष्टये, अभ्यासक्रम, अध्यन अध्यापन पध्दती, शिक्षक- विद्यार्थी संबंध, शिस्त, प्रशासन इत्यादी संबंधीचे विचार म्हणजेच शैक्षणिक विचार होय. "

- **मराठी विश्वकोश, खंड-१२**

१.३.४ एक अभ्यास :-

अभ्यास हा शब्द अभि + यास या संस्कृत धातूपासून बनला असून त्याचा अर्थ भोवती बसून शिकणे होय.

अभ्यास म्हणजे सराव करणे होय.

१.४ संशोधनाची गरज :-

१. आजच्या अभ्यासक्रमातील उणिवा समजून घेण्यासाठी व अभ्यासक्रमाला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्यासंदर्भात प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

२. शिक्षकांना आपले व्यावसायिक कार्य प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, मूल्ये, तत्वे व प्रेरणा यांचा बोध प्रस्तुत संशोधनादवारे घडेल.

३. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचार आजच्या शिक्षणपध्दतीला मार्गदर्शन करणारे आहेत.

४. शिक्षणाची ध्येय साध्य करण्यासाठी या संशोधनाची गरज आहे.

५. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचार सद्यस्थितीतील शिक्षणप्रक्रियेला योग्य दिशा देणारे आहेत.

६. प्रस्तुत संशोधन शिक्षणप्रक्रियेला चालना देण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

७. शिक्षणप्रक्रियेला अद्यावतता प्राप्त होण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

१.५ संशोधनाचे महत्व :-

१. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे लेखन, वक्तृत्व, अभ्यास, अध्यापन कार्यशैली प्रत्येक शिक्षकाच्या दृष्टिने उपयुक्त आहे. त्याचा परिचय सर्वांना व्हावा यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

२. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या चारित्र्यसंपन्न आदर्श जीवनातून उत्क्रांत झालेल्या शैक्षणिक विचारातील महत्वपुर्ण पैलूंची उकल होणे आवश्यक आहे.

३. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे मुल्यशिक्षण अध्ययनाच्या पध्दती इत्यादि संबंधीचे विचार हे

विद्यार्थ्यांच्या संदर्भात महत्वाचे ठरतात.

४. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी विद्यार्थ्यांशी जे अनौपचारिक संबंध ठेवले ते आज शिक्षक- विद्यार्थी संबंध कसे असावेत या संदर्भातील विचार महत्वाचा वाटतो.

५. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचार हे शिक्षणपध्दतीला सुयोग्य मार्गदर्शन करणारे आहेत.

१.६ संशोधनाची उदिष्टये :-

१. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या चरित्राचा अभ्यास करणे.

२. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शैक्षणिक विचारांच्या दृष्टिकोनातून शिक्षणप्रक्रिया अभ्यासणे.

3. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शैक्षणिक विचारांचे आजच्या शिक्षणपध्दतीतील योगदान अभ्यासणे.

४. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे शैक्षणिक विचारातील मुल्यशिक्षण व व्यक्तिमत्व विकास विषयक संकल्पनाचा शोध घेणे.

५. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शैक्षणिक विचारातील शिक्षणाची ध्येय, अभ्यासक्रम, अध्ययन – अध्यापन पध्दती, प्रशासन व शिक्षणसंस्थाची कार्य यासंदर्भातील विचार अभ्यासणे.

१.७ संशोधनाची गृहितके :-

१. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शैक्षणिक विचार अत्यंत महत्वाचे आहेत.

२. प्राचार्य शिवाजीराव भोसले हे तत्वज्ञानाचे प्रगाढ पंडित आहेत.

३. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या मुल्यशिक्षण व व्यक्तिमत्व विकासाच्या संकल्पना अत्यंत स्पष्ट व प्रखड आहेत.

4. प्राचार्य शिवाजीराव भोसले हे सर्व महान व्यक्तिचे अभ्यासक असले तरी ते एकाचे अनुयायी नसून त्यांची स्वत:ची एक स्वतंत्र विचारसरणी आहे

१.७ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्याचे योजीले आहे.

१.८ माहिती संकलनाची साधने :-

१.९.१ प्राथमिक स्त्रोत :-

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी लिहिलेले साहित्य , केलेली व्याख्याने, मांडलेले विचार इ. चा समावेश करण्यात आला आहे.

१.१० दुय्यम स्त्रोत :-

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी लिहिलेले ग्रंथ , विविध मासिकातील लेख इ. चा समावेश करण्यात आला आहे.

संदर्भ सूची :-

१. भोसले, प्राचार्य शिवाजीराव , कथा वक्तृत्वाची, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पूणे

२. भोसले, प्राचार्य शिवाजीराव , मुक्तिगाथा महामानवाची, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पूणे

३. भोसले, प्राचार्य शिवाजीराव , यक्षप्रश्न, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पूणे

४. भोसले, प्राचार्य शिवाजीराव , दीपस्तंभ, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पूणे

५. भोसले, प्राचार्य शिवाजीराव , जागर, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पूणे

-:: मार्गदर्शक ::-

प्रा.डॉ.कदम व्यंकट काशिनाथराव

-:: संशोधक::-

चपडे गणेश नारायणराव